Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

SADBHAKTI PRAKASH

द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.

**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ६०.फोन : २८२४५२७२




(वर्ष ९४) चैत्र ते ज्येष्ठ - शके १९४४ - एप्रिल ते जून २०२२ (संयुक्तांक ७ ते ९)

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | मनोगत | ६ |
| ३) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ७ |
| ४) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | १९ |
| ५) | विनंती | २५ |
| ६) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २६ |
| ७) | निवेदन | ३० |
| ८) | अमृतकण | ३२ |
| ९) | सद्भक्तांना आवाहन | ३४ |
| १०) | विशेष सूचना | ३६ |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।



## - संपादकाचे बोल -

### (वर्ष ९४) पौष, माघ, फाल्गुन (शके १९४३) (संयुक्तांक ७ ते ९) (जानेवारी, फेब्रुवारी, मार्च) मासांतील कार्यक्रमाचा गोषवारा

सद्भक्ति प्रकाशचा हा अंक वाचकांना सुपुर्द करण्यात मनाला अतीव आनंद होत आहे. एखाद्या घोर संकटांतून बाहेर पडल्यावर आपण सुटकेचा निश्वास टाकतो तसेच आज हा अंक देताना मनाला खूप आनंद होत आहे. शांत वाटत आहे. आता आमच्या सद्‌गुरुंच्या चरणाशी येताना ऊर समाधानाने भरून आला आहे. खरोखर आमचे सद्‌गुरु खूप दयाळू आहेत. त्यांची आपल्यावर सदैव कृपादृष्टि आहे. म्हणूनच या वर्षीच्या उत्सवाला आपल्याजवळ बोलावून घेतले आहे. टाळेबंदीच्या काळात या अंकाची वाटचाल सुरूच होती व आता यापुढे ती अव्याहत चालू राहिल हीच त्यांच्या चरणी प्रार्थना.

शनिवार दि. १.१.२०२२ रोजी गोखिवरे येथील श्री कृष्ण मंदिराच्या स्थापना दिनासाठी काही सद्भक्त तेथे गेले व पूजा, प्रार्थना व सुमधूर पदे म्हटली.

शुक्रवार दि. १४.१.२०२२ला मकर संक्रांत होती. त्यावेळी 'तीळगूळ घ्या, गोड गोड बोला' ह्या प्रवचनाचे वाचन झाले.

सोमवार दि. २४.१.२०२२ रोजी (पौष वद्य षष्ठी) श्री तात्यासाहेब कोटणीस महाराज पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

शुक्रवार दि. २८.१.२०२२(पौष वद्य एकादशी - षट्तिळा एकादशी) रोजी सद्गुरु श्री पार्वतीमाता पुण्यतिथी दिन होता. सकाळी सत्वन व प्रार्थना झाली. त्याचवेळी गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली व (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा आणि प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी चरित्र वाचन झाले.

## परात्पर गुरु श्री नारायण बाबा रत्नागिरी वासी परमष्ठि गुरु श्री राधाकृष्ण तोरणे ह्यांचा पुण्यतिथ्योत्सव

बुधवार दि. २.२.२०२२ला (माघ शुद्ध प्रतिपदा) मातोश्री श्री लक्ष्मीमाता पुण्यतिथी दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी ५ वाजता चरित्र वाचन झाले.

बुधवार दि. २.२.२०२२ रोजी (माघ शुद्ध द्वितीया) श्री नारायण बाबा व श्री राधाकृष्ण तोरणे महाराज पुण्यतिथी दिन होता. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. नंतर गाभाऱ्यातच एकादशणी केली गेली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा व शेवटी (३) माधुरी, प्रेमभक्ति, माधुरी कृष्णभक्त। ती दे कृष्णराया।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

गुरुवार दि. ३.२.२०२२ला सायंकाळी ६ वाजता हळदीकुंकू समारंभ झाला.

शुक्रवार दि. ४.२.२०२२ (माघ शुद्ध चतुर्थी)ला श्री गणेश जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ५ वाजता श्री सिद्धिविनायकाचे व्यापक स्वरुप या विषयावरील प्रवचन-वाचन झाले व ६ वाजता नामसंकीर्तन झाले.



शनिवार दि. ५.२.२०२२ रोजी वसंत पंचमी (श्री शांतादुर्गा महोत्सव ) होती. बाळमंडळाचा वाढदिवस होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन प्रार्थना केली गेली. सायंकाळी ७ वाजता रासलिलाभिनय श्रीकृष्ण भक्तीपर सुमधुर पदे म्हणण्यात आली व 'वैकुंठीचा प्रसादमेवा' ह्या सद्गुरु दादाभाईंच्या आशिर्वादपर प्रवचनाचे वाचन झाले.

सोमवार दि. ७.२.२०२२ (माघ शुद्ध सत्पमी) रथसप्तमी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. व उत्सव समाप्ती झाली. सद्गुरुंची कृपा व्हावी म्हणून कळकळीची प्रार्थना करण्यात आली.

बुधवार दि. १६.२.२०२२ (माघ पौर्णिमा) श्री मंगेश महोत्सवानिमित्त सकाळी स्तवन व प्रार्थना केली गेली. रात्रौ ९ वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक निघाली.

गुरुवार दि. २४.२.२०२२ (माघ वद्य नवमी) श्री रामदास स्वामी नवमी होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना केली गेली. सायंकाळी ५ वाजता श्री रामदासस्वामी यांच्या चरित्राचे वाचन झाले.

मंगळवार दि. १.३.२०२२ (माघ वद्य चतुर्दशी)ला महाशिवरात्र होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक निघाली.

शुक्रवार दि. ४.३.२०२२ (फाल्गुन शुद्ध द्वितीया) रोजी श्री रामकृष्ण परमहंस जयंती होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. सायंकाळी भजनानंतर श्री रामकृष्ण जयंती या विषयावर खारमिशनमध्ये झालेल्या प्रवचनाचे वाचन झाले.

## श्री दत्तमूर्तीच्या व श्री नारायण महाराजांच्या सुवर्ण पादुका स्थापना दिन व श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिर वर्धापन दिन महोत्सव

बुधवार दि. ९.३.२०२२ (फाल्गुन शुद्ध सप्तमी) रोजी श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन होता. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली.

११.३० वाजात एकादशणी झाली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) गुरुचे भजन, हेंचि माझे ध्यान (४) आले आले रघुनाथ मंदिरी आले ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली.

रविवार दि. १३.३.२०२२ (फाल्गुन शुद्ध दशमी) रोजी श्री दत्त व श्री नारायण महाराज सुवर्ण पादुका स्थापना दिन व श्री रामेश्वर मंदिर वर्धापन दिन होता. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना करण्यात आली. यावर्षी एकादशणी गाभाऱ्याबाहेर करण्यात आली हीच सद्‌गुरु कृपा! ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा (२) मनोभाव जाणुनि माझा (३) म्यां शंकर पुजिला, भावे पुजिला(४) संतचरण तीर्थी करीन आंघोळी । ऐसे वनमाळी करी मज।। (५) श्री भाईंनी साद ऐकुनि मंगेश इथे आले (६) आमुच्या कल्याणा कारणे झटशी। नित्य सुखराशी नारायणा।। (७) दत्तजी! आये तुम्हारे पास। तुम्हारे दिव्य चरण की आस।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. त्यानंतर संतर्पण व महाप्रसाद झाला व त्याची गोडी दोन वर्षांनंतर सर्व सद्‌भक्तांना चाखायला मिळाली. तसेच ५.३० वाजता जगदाराध्य त्रिमूर्तीच्या पादुकांची स्थापना या विषयावरील प्रवचनाचे वाचन झाले. सायंकाळी ५.३० वाजता गुरुगीता वाचन झाले. रात्रौ ९ वाजता पालखी व मिरवणूक संपन्न झाली.

## परमप्रिय सद्‌गुरु श्री दादाभाईंचा पुण्यतिथ्योत्सव

सोमवार दि. १४.३.२०२२ आमलकी एकादशी या दिवशी श्री एकनाथ स्वामी महाराजांचे ओवीबद्ध प्रतिष्ठान चरित्र वाचनास प्रारंभ झाला.

शुक्रवार दि. १८.३.२०२२ (फाल्गुन वद्य प्रतिपदा-पौर्णिमा)ला श्री गौरांग प्रभुजयंती होती. सकाळी स्तवन व प्रार्थना केली गेली.

शनिवार दि. १९.३.२०२२ (फाल्गुन वद्य प्रतिपदा) रोजी सद्‌गुरु दादाभाईंची पुण्यतिथी होती. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना करण्यात आली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी (१) माझी देवपूजा, देवपूजा। पाय तुझे गुरुराजा।। (२) मनोभाव जाणुनि माझा। सगुण रुपधरिले ओजा (३) अधिरनयन झाले हे पहाया। रुप गुरुराया दिव्य तुझे।। (४) आज सखी सद्‌गुरु आये। मेरे मन आनंद भयो रे।। (५) गुरु माझा मी गुरुचा। दास त्यांचा बहु



जन्मीचा।। (६) यारे यारे सद्‌गुरुच्या घरी जाऊं। प्रेमभक्तीचा सोहळा डोळा पाहू।। (७) देई मला इतुके गुरुराया (८) तो मज आठवतो गुरुराजा। प्राणविसावा माझा।। आणि शेवटी (८) साकार मूर्तीचे दर्शनाची चाड। नसे ते आवड कैवल्याची।। ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण संतर्पण व अमृततुल्य महाप्रसादाचा लाभ सर्व सद्‌भक्तांना मिळाला. सायंकाळी ५ वाजता प्रतिष्ठान चरित्र व ५.३० वाजता सद्‌गुरुंचे वैकुंठारोहण वाचन झाले व नंतर गुरुवर्यांच्या दिव्य आवाजातील ध्वनिमुद्रित प्रवचन ऐकून सर्वांचे कान तृप्त झाले. त्यावेळी (१) जन्मोजन्मी ऐसा सद्‌गुरु मिळावा। संतमेळा ऐसा सदा सजावा (२) अनंत जन्मीचे पुण्य फळां आले (३) मी बाळ तूं जननी (४) लागे लागे मना गुरुपायी। चंचळ हे मन सुनिश्चल करुनि चरणी ठेवी डोई (५) भगवद्‌चरणी तल्लीन होऊनि देहावरती येवूं नको। व्यर्थ भवाच्या गोष्टी करूनि काळाचा व्यय करूं नको।। हा मधुर फटका म्हणण्यांत आला. आणि शेवटी (६) घाली पंखाखाली सद्‌गुरुमाऊली। करोनि साऊली कृपेची गे।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यांत आली. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव संपन्न झाला व प्रत्येक सद्‌भक्त सद्‌गुरुंचे शतदा आभार मानून आगळ्या वेगळ्या आनंद परतला.

रविवार दि. २०.३.२०२२ (फाल्गुन वद्य द्वितीया) श्री तुकारामबीज होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. सायंकाळी ५ वाजता नाम संकीर्तन झाले.

बुधवार दि. २३.३.२०२२ रोजी (फाल्गुन वद्य षष्ठी) श्री एकनाथ षष्ठी होती. सकाळी स्तवन व प्रार्थना झाली. ५.३० वाजता प्रतिष्ठान चरित्र वाचन, समाप्ती व सद्‌गुरु दादाभाईंचे ध्वनिमुद्रित प्रवचन, श्रवण व उत्सव समाप्ती व कळकळीची प्रार्थना करण्यांत आली.

**: इति :**

**ताजा कलम —**

टाळेबंदीनंतर मंदिर श्री सद्‌गुरुकृपेने सुरू झाले व उत्सवांना प्रारंभ झाला. पण टाळेबंदीच्या अतिशय कठीण काळात श्री. केळकर गुरुजी, गुरुभगिनी सौ. मुक्ताताई गुप्ते, गुरुभगिनी वीणा नावडा व गुरुबंधू अरुण विजयकर ह्यांनी मंदिराच्या सर्व वेळेच्या सेवा, भजन अव्याहत सुरू ठेवले. तसेच काम करणारी अर्पिता हीसुद्धा नियमितपणे मंदिराची स्वच्छता करीत होती हे खरोखरच कौतुकास्पद आहे. श्री सद्‌गुरु त्यांना असेच बळ देवो व दिर्घायुष्य देवो हीच त्यांना विनंती.

।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

दोन वर्षाच्या टाळेबंदीनंतर श्री गुरुदर्शनाचा झालेला आनंद व मनोगत...

आला अजि दिन आनंदाचा।
लाभ मिळाला श्री गुरुदर्शनाचा।।धृ.।।
दोन वर्षे, दोन युगे भासली।
तव भेटीची आस लोपली।।
पण दयाळू गुरुमाऊली।
हात दिधला आशिषाचा।।१।।
मायबापा अंत नका पाहूं।
सांग तुजला कितीदां विनवूं।।
भावसुमने तुजला वाटूं।
नित्य ठेवितो चरणी माथा।।२।।
बहु दिसांनी झाले दर्शन।
न सोडी आता तुमचे चरण।।
तव दर्शना आसुसले मन।
हेंच मागतो सद्गुरुनाथा।।३।।

संपादिका : सौ. निर्मला चंद्रशेखर काळे



।। श्री सद्गुरुभ्योनमः ।।

# श्री गुरुवर्य श्री भाईंचे प्रवचन

**१३.४.१९३१**

**।। श्री मंगेश ।।**

आज आपण श्री मंगेशाच्या कृपेने मुंबईहून त्याच्या चरणाजवळ आलो आहो, तेव्हा त्यांचे थोडे बहुत गुणवर्णन करणे हे आपले कर्तव्य आहे. पण आपण त्यांचे गुणवर्णन काय करणार ? त्याचीच जर इच्छा असेल तरच त्यांचे गुणवर्णन करणे शक्य आहे :- **"आपुलिया बळे नाही बोलवत। सखा कृपावंत वाचा त्याची।।"** सर्व वाचा त्याच्यापासून निघाल्या आहेत. ईश्वराच्या सत्तेने सर्व जीव जंतूंची हालचाल होत असते. सूर्य त्याच्याच सत्तेने प्रकाश देतो आणि सृष्टींत ज्या काही घडामोडी होतात, त्या सर्वांना श्री मंगेशाचाच आधार आहे असे जाणणें ह्यालाच भागवत धर्म म्हणतात :- **"मी एकु कर्म कर्ता। ऐसी उठो नेदी अहंता। ते कर्मचि स्वभावतां। अर्पी श्री अनंता ईश्वरातें।।" आणि "कर्ता रामचि मानूनि आचरसी शुद्ध भागवत धर्म।।"** श्री मारुतीरायाने भागवत धर्म कसा आचरण करावा ह्याचा आम्हा सर्वांना उत्तम धडा घालून दिला आहे. श्री. रामदास स्वामी म्हणतात की आपण होऊन म्हणजे 'मी देह' ह्या भावनेने जर कर्म केले तर त्याला अपयश येते ह्याचे कारण

असे आहे की जीवाची शक्ति अल्प आहे म्हणून त्याला अपयश येते, पण सर्व शक्तिमान भगवान् सर्व काही करितो ह्या भावनेने कर्म केले, तर त्यात यश सहज येईल, कारण तो 'यशवंत' म्हणजे स्वत: मूर्तीमंत यश आहे.

आजचा दिवस मोठा आनंदाचा आहे. मी अनेक वेळा एकटा अगर कुटुंबासह आलो होतो. पण आज सद्भक्ति मंदिरातील सर्व बाळ गोपाळांना घेऊन मी येथे आलो आहे. म्हणून मला विशेष आनंद आहे. ही सर्व मंडळी श्री मंगेशाचे नेहमी प्रेमाने भजन करीत असते. ह्यामुळे त्यांचा येथे येण्याचा योग श्री मंगेशानेच घडवून आणिला. त्यातल्या त्यात आज विशेष आनंदाचा योग आहे. कारण आज सोमवार व एकादशी आहे. यावरून आपल्या सहज लक्षात येईल की श्री मंगेशाला विष्णूची फार प्रीती आहे. शिवाय श्री मंगेश आमचा कुलस्वामी आहे आणि आम्ही विष्णू भक्त आहोत. असा आमचा दुहेरी संबंध आहे. आज चमत्कार असा झाला की श्री मंगेशास नैवेद्य पाठविण्यास भूल पडली. नंतर आज एकादशी आहे ह्याची आठवण झाली, तेव्हा जे झाले ते श्री मंगेशाच्या इच्छेने झाले. कारण आज त्याच्या मनात एकादशी करावयाची होती हा विचार मनात येऊन समाधान झाले. मग श्री मंगेशास फराळाचा नैवेद्य पाठविण्यात आला आणि सर्व यथास्थित झाले. ह्यावरून हा धडा घ्यावा की जो एकादशी व शिवरात्र प्रेमाने करितो तोच खरा वैष्णव व शैव, कारण शिव व विष्णू भिन्न आहेत.

आजचा आनंदाचा दिवस आहे. त्याचे तुकाराम महाराजांनी असे वर्णन केले आहे :- "**आजि आनंदु रे, एकी परमानंदु रे। जया श्रुति नेति नेति म्हणति गोविंदु रे।।**" श्री मंगेशाच्या भेटींत जी सुख प्राप्ति होते, त्याचें वर्णन श्रुतीला ही करिता येत नाही :- "**न कळे, न कळे, नेति, नेति। श्रुति ऐसें बोलती।।**" "**ऐसा भि नहीं, वैसा भि नहीं।।**" "**विठोबाची वेडी आम्ही आनंदु सदा। गाऊं नाचू वाहू टाळी, रंजनू गोविंदा।। सदा सण सात आम्हा नित्य दिवाळी। आनंदे निर्भर आमुचा कैवारी बळी।।**" प्रापंचिक लोक विषय सुखातच आनंद मानतात. परंतु भक्तांना भगवंताचे नाम गाऊन नाचण्यात आनंद वाटतो. आणि हा स्वरुपानंद विषयानंदपेक्षा कोटी गुणे श्रेष्ठ असल्यामुळे संत त्याचा नेहमी लाभ घेतात



आणि त्यामुळे त्यांची रोज दिवाळी असते.

**"तुका म्हणे नाही जन्म मरणाचा धाक। संत सनकादिक आमुचें पाहती कौतुक।।"**

आज आपणाला श्री मंगेशाच्या व्यक्त स्वरुपाचे दर्शन झाल्यामुळे आनंद झाला असे वर म्हटले आहे. पण तुकाराम महाराज म्हणतात :- "**एकी परमानंदु रे।।**" ह्यावरून आनंद आणि परमानंद ह्यांत फरक आहे हे उघड आहे. परंतु दोन्ही श्री मंगेशापासूनच प्राप्त होतात. श्री मंगेशाच्या अव्यक्त स्वरुपाशी ऐक्य होऊन जो आनंद होतो. त्याला परमानंद म्हणतात. आपण जी मंगेशाची प्रार्थना करितो त्यात त्याच्या अव्यक्त स्वरूपाचे स्तवन केले आहे :- "**देवा, मंगेशा तू अससी केवळ अनादि चैतन्य।।**" हेच श्री मंगेशाचे खरे अनादि अव्यक्त स्वरूप. हे स्वरूप जाणण्याला फार परिश्रम लागतात, आणि ते सद्गुरुच्या कृपेशिवाय जाणता यावयाचे नाही. ह्या अव्यक्त स्वरुपाचे सोहिरोबाने मोठ्या मार्मिक रीतीने वर्णन केले आहे, ते असे :- "**त्या देवांचे तू दर्शन घे। संसार मोहांतूनी त्वरित निघे।।ध्रृ.।।**"

संसार म्हणजे सम्यक् सार अर्थात् उत्तमांतला उत्तम जो हा नर देह, कारण ह्याच देही श्री मंगेशाच्या अव्यक्त स्वरुपाचे दर्शन होणे शक्य आहे. इतर देहांत ह्या स्वरुपाचे ज्ञान होणे शक्य नाही. देवादिकांचे देह मनुष्य देहापेक्षा श्रेष्ठ आहेत. पण त्या देहांत ज्ञान होत नाही. म्हणून सर्व देवांनी नारायणाची प्रार्थना केली की, हे भगवंता, आम्हाला या देहाचा वीट आला आहे. तर आमच्यावर कृपा कर आणि आमचा उद्धार कर. परंतु देव अत्यंत रजोगुणी असल्यामुळे भगवंताला त्यांची इच्छा पूर्ण करितां आली नाही, पण त्याने त्यांना आश्वासन दिले की, "मी कृष्णावतार धारण करीन तेव्हा तुम्ही सर्व गोपी व्हा, म्हणजे माझ्या संगतीद्वारा तुमचा उद्धार होईल", आणि त्याप्रमाणे घडून आले. तसेच पिशाच योनींत ही ज्ञान होत नाही. ते ज्ञान ह्या नरदेहांतच होणे शक्य आहे. म्हणून सोहिरोबा ह्या देहाला सम्यक् सार म्हणतात आणि मोठ्या कळकळीने उपदेश देतात की :- "**संसार मोहांतूनि त्वरित निघे।।**" आता नुसता नर देह प्राप्त झाला आहे म्हणून ज्ञान होईल असे खात्रीने सांगता येत नाही. चित्त शुद्धि झाल्यावर स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण

ह्या चारी देहांचा निरास झाल्यावर सद्गुरु कृपेने श्री मंगेशाच्या खऱ्या स्वरुपाचे दर्शन होईल.

आता ते स्वरूप कसे आहे ह्याचा आपण विचार करू. सोहिरोबा म्हणतात :- **"आदि मध्य ना अंत जयाला। नेति नेति म्हणती वेद तयाला। ज्या पासूनि ॐकारहि झाला। ब्रह्मा विष्णू हर हे तिघे।।"** ॐकार हा अ, उ, म ह्या तीन अक्षरांपासून झाला आहे. 'अ'कार किंवा शून्याकार हा निर्गुण स्वरुप, अनादिचैतन्य, ह्याचे द्योतक आहे. ह्या अकारांतून, शून्याकारांतून एक शूंडाकृति फाटा निघाला तो 'उकार' झाला म्हणजे निर्गुण ब्रह्माच्या ठायीं 'अहं ब्रह्मासि' अशी वृत्ती निघाली. तो सगुण ईश्वर, अपाणिपाद भगवान, शूंडाकार गणेश. ह्या सगुण ब्रह्माच्या ठिकाणी जी दुसरी वृत्ती उठली ती 'मकार', 'विश्वाकार', 'विश्वत्रिगुण' ह्या वृत्तीलाच गुणमयी माया म्हणतात. ह्या 'मकारा'लाच धुंडीराज म्हणतात. तोच चतुर्दश भुजेने झाला. अर्थात् त्या भुवनांचा योग क्षेम चालण्याकरिता 'उकार' विष्णु रूपाने त्याचे पालन करू लागला. त्यांचा संहार करण्याचे काम त्याच्या शिवरूपाकडे ओघानेच आले. जसे वाफेचे पाणी होते व पाण्याची गार होते, तसे हा ओंकारच ब्रह्म निर्गुण, ब्रह्म, सगुण आणि विश्व त्रिगुण झाला आहे :- **"उदकाचे बाष्प निराकार रुप। तेवीं तूं अरुप शिवसूता।। अपाणि सगुण तूंचि गजानना। शमवाया तृष्णा गंगाजळ। विश्वगार रुप शारदा होऊनि। मोह तूं घालूनी धुंडीराजा।।"**

ह्या धुंडीराजाने सर्व जीवांना मोहात घातले त्यामुळे ते नानाप्रकारची दु:खे भोगू लागले. त्यांना दु:खातून सोडविण्यासाठी :- **"शुद्ध सत्त्वाकार रामकृष्ण होसी। निर्माण करिसी नाम लीला।।"**, सगुण ईश्वरानेंच रामकृष्णादि अवतार धारण करून जीवांचा उद्धार केला. रामकृष्णादि अवतारांच्या नाम लीला गायिल्याने अंत:करण शुद्धि होते :- **"यथायथात्मा परिमृज्यते सौ। मत्पुण्य गाथा श्रवणाभिधानै। तथा तथा पश्यति वस्तु सूक्ष्मं। चक्षुर्यथैवांजन संप्रयुक्तम्।।"** जसजसे डोळ्यांत अंजन घालावे, तसतसे डोळ्यावरचे पडळ निघून जाऊन दृष्टि तीक्ष्ण होते, तद्वत् बुद्धिरुपी डोळ्यावर आलेलेल पडळ भगवंताच्या गुणानुवादाच्या अंजनाने सूक्ष्म होऊन ती विकाररहित होते आणि खरी वस्तू जो आत्मा त्याला पाहण्यास समर्थ



होते. नुसते अंत:करण शुद्ध झाले म्हणजे ज्ञान होते असे नाही. त्याला सद्गुरुची मदत लागते. म्हणून रामकृष्णादि अवतारी पुरुषाचें भजन केले असता तेच सद्गुरुपाने प्रगट होऊन ज्ञानोपदेश करितात. येथे असा प्रश्न उद्भवतो की जर रामकृष्णादि अवतार आता येथे व्यक्तिरूपाने नाहीत, तर ते बोध कसा करू शकतात. ह्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की जरी ते आता व्यक्तिरूपाने नाहीत आणि त्यामुळे त्यांना त्या रूपाने बोध करिता येत नाही, तरी ते शक्तिरूपाने येथे आहेतच. तेव्हा ते आपल्या शक्तिचा उपयोग करून संतांच्या तर्फे उपदेश करितात. रामकृष्णादिकांनी काही विशिष्ट कार्याकरिता अवतार धारण केले होते. राम रावण कुंभकर्णादिकांना मारण्याकरिता आले होते. आणि कृष्ण कंसादिकांचा संहार करण्यासाठी भूतलावर आले होते. शिवाय धर्म स्थापना करून त्यांनी बोध करण्याची कामगिरी ही केली. रामाने लक्ष्मण, मारुती, शबरी वगैरे ना बोध केला. कृष्णाने अर्जुन, उद्धवादिकांना ज्ञान दिले. हे कार्य करून ते स्वधामाला जाते झाले. परंतु रामकृष्णादि अवतारांना जगद्गुरु म्हणता येत नाही. जगद्गुरु हे नाव एकट्या दत्तात्रेयालाच दिले आहे. रामकृष्णादि अवतार आणि गुरुदेव दत्त ह्यांच्यामध्ये बराच फरक आहे. दत्त हा सर्वकाळी व सर्व लोकांकरिता असून तो स्मृतिगामी आहे. म्हणजे तो सध्या व्यक्ति व शक्तिरुपाने प्रगट आहे. रामकृष्णांनी अवतार घेतला त्यावेळी ते दोन्ही रूपाने प्रगट होते, पण आता ते फक्त शक्तिरुपाने आहेत. तसेच पूर्वी होऊन गेलेले सत्पुरुषही आता शक्तिरुपाने उरले आहेत. याकरिता ह्या अवतारी पुरुषांचे नामस्मरण, भजन केले असता ते दत्तात्र्याच्या मार्फत बोध करण्याचे काम करीतात. ॐकारांतील कंसाकार अर्धमात्रा हे सद्गुरुतें दत्तात्र्याचें द्योतक आहे. ॐकारांतील मकाराने सर्व जीवांना मोहात घातल्यामुळे त्यांच्या उद्धारार्थ सद्गुरुने-दत्तात्रयाने अवतार घेतला. व त्याच्याच पासून सर्व सांप्रदायातील लोकांना बोधामृताचें पान करिता आले. जनार्दन स्वामींना व श्री नारायण महाराजांना प्रत्यक्ष दत्ताने बोध केला होता हे आपणाला विदित आहेत.

**"ज्या पासूनि ॐकार ही जाहला। ब्रह्म विष्णू हर हे तिघे।।**
**अगम्य अगोचर सत्ता ज्याची। सहज लीला हे त्याची।।**
**जारज स्वेदज अंडज उद्भिज। ज्यापासूनि सहज निघे।।"**

ह्या ॐकारापासून ही सृष्टि सहज उत्पन्न झाली. "**स्वभावस्तु प्रवर्तते।।**" चतुर्दश भुवनांची रचना का झाली हे सांगता येत नाही, कारण त्यात काही कार्य कारण भावच नाही. "**जारच स्वेदज अंडज उद्भिज। ज्यापासूनि सहज निघे।।**" जारज, स्वेदज, अंडज व उद्भिज ह्यांत सर्व चतुर्विध सृष्टिचा समावेश होतो. ही सर्व सृष्टि शारदेने - गुणमयी मायेने निर्माण केली व जीवांना मोहात टाकिले. गुरुदेव दत्ताने - सद्गुरुने बोध केल्याशिवाय ह्या मायेच्या जाळ्यांतून सुटका होणार नाही. हा ज्ञानबोध झाल्यावर जो प्रत्यक्ष अनुभव येतो ते असा :-

**"दृश्य सकळ ही टाकुनी जातां। निरालंबी राहतां।**
**प्राणापान ऊर्ध्व ही वाहतां। आनंद भुवनीं मन हे रिघे।। "**

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण ह्या चारी देहाचा निरास करून, तसेच पंच कर्मेंद्रियें व पंच ज्ञानेंद्रियें, मन व बुद्धि ह्यांच्या पलिकडे जी वस्तू आहे त्या वस्तूचे ज्ञान गुरुदेव दत्त सद्गुरुच्या द्वारे करून देतो :- "**बुद्धिग्राह्यं मतींद्रियम्।।**" फक्त सत्त्वगुणी बुद्धिनेंच आत्मस्वरुपाचें ज्ञान होऊ शकते. बुद्धिला ह्याप्रमाणे अनुभव आल्यावर मग "**आनंद भुवनीं मन हें रिघे।।**" मन परमानंदांत तल्लीन होऊन जाते. त्या सुखापुढे विषय सुखक: पदार्थ वाटतो :- "**यं लब्ध्वा चा परं लाभं मन्यते नाधिकं तत:।।**" (भ.गी. ६/२२) हे श्री मंगेशाचे खरे स्वरुप आहे ते जाणल्यावर दु:ख म्हणून रहातच नाही म्हणून सोहिरोब म्हणतात :-

**"सोहिरा म्हणे निरामया, झालीचना हेचि काया।**
**मिठी पडली चिन्मयासी, मिनली तन्मया।।"**

जेथें देहच नाही, तेथें देहावलंबी दु:ख कोठून राहणार ?

**"म्हणे सोहिरा शून्याकार रुप नाहीं आकार।**
**परब्रह्म निर्विकार आंत बाहेर अवघें।।"**

श्री मंगेशाचे स्वरुप शून्याकार म्हणजे अकारासारखें निर्गुण निराकार आहे. अव्यक्त स्वरुप व्यक्त स्वरुपापेक्षा श्रेष्ठ आहे हे नुसते शाब्दिक रीतीने समजून उपयोग नाही. त्याचे अनुभवे करूनच ज्ञान झाले पाहिजे. ते होण्याला पहिल्याने श्री मंगेशाच्या व्यक्त स्वरुपाचीच आराधना केली पाहिजे मग क्रमाने खऱ्या स्वरुपाची



ओळख पटेल. याकरितां "**सदा श्री हरीचें नाम मुखीं गात जा रे।।**" ज्ञान असो वा नसो, सिद्ध असो व साधक असो, त्याला नामस्मरण करणे अवश्य आहे. कारण शारदा-गुणमयी माया त्याला मोहांत घालण्यास तयार आहे आणि ती त्याला केव्हा आपल्या जाळ्यात अडकावील ह्याचा नेमच नाही. शिवाय दुसरे असे एक कारण आहे की नाम जर सोडले, तर बुद्धिला जाड्यत्व येईल. उदाहरणार्थ डॉक्टरची शस्त्रे किती जरी पाणीदार असली तरी त्यांना वरचेवर धार दिलीच पाहिजे. तसे हे नाम बुद्धिवर येणारा मल साफ करितो. न्हावी कुशल असला तरी धारेच्या दगडाशिवाय त्याचे काही चालणार नाही. तद्वत् नामाच्या योगे स्वरुप प्रकाशमान करते :- "**नामें चित्त शुद्धि चितीं। आणि स्वरुप स्थिती साधकां।।**" सारांश देह पडे पर्यंत नामस्मरण केलेच पाहिजे.

श्री मंगेशाच्या व्यक्त रुपाची उपासना कशी करावी हे एका संताने उत्तम रीतीने सांगितले आहे त्याप्रमाणे करावे :-

**"सदा श्री हरीचें नाम मुखीं गात जा रे।।ध्रु.।।**
**वर्णाश्रम विहित कर्म करणें हा प्रथम धर्म।**
**निरहंकृत्ती कंजनयन ध्यात जा रे।।१।।"**

श्री मंगेशा! तुझ्या अव्यक्त स्वरुपाचें मला ज्ञान नाही. ते व्हावे म्हणून मी तुझ्या व्यक्त स्वरुपाचे द्वैत रीतीने ध्यान, भजन करितो :-

**"अद्वैत हें निगम सिद्ध खरें तथापि।**
**नाहीं मला अनुभव स्वसुख स्वरुपीं।।**
**तो ईश्वर मज घडो म्हणवूनि देवा।**
**जिज्ञासु सेविल तयासि फळेल सेवा।।"**

अशा द्वैत रीतीने भजन करणाऱ्या मुमुक्षूला श्रुतीने सांगितलेला दोष लागत नाही :- "**अथ योऽन्यां देवतामुपासते।।**"

असे भजन केल्याने मुमुक्षूची एक प्रकारची चित्त शुद्धि होत असते. ती अलंकाराला ओप देऊन चकचकीत करितात त्या प्रकारची असते :- "**करुनि विहित कर्मे साधिली चित्त शुद्धी। श्रवण मननमात्री योग्यता हेचि सिद्धि।।**" परंतु अशा

शुद्धिने मुमुक्षू ज्ञानाचा बोध होण्यास योग्य होत नाही. तो सत्संगतींत श्रवण करण्यास मात्र अधिकारी होतो :-

**"सत्संगे शास्त्र श्रवण, श्रवणाचे करुनि मनन।**

**निदिध्यासें पूर्णपणें रहात जावें।।"**

सर्व शास्त्राचे हेच सार आहे की आत्माच एक खरी वस्तू आहे. वरकड सर्व अनात्मा म्हणजे खोटे आहे. ह्याला आत्मानात्म विवेक म्हणतात आणि त्याचे ज्ञान झाले की अर्थात् मुमुक्षू आत्म्याची प्रीति करू लागतो व अनात्म्याचा त्याला वीट येतो म्हणजे वैराग्य उत्पन्न होते व त्याला आत्म्याच्या दर्शनाचा ध्यास लागतो. त्याचेच नाव निदिध्यास, त्याचप्रमाणे त्याची सद्गुरुवर असलेली श्रद्धा-भाव वाढत जातो :- **"सत्संगे भाव उपजे देहीं। सत्संगे सद्गुरु भेटी पाहीं।।"** संतच सद्गुरुचा अधिकार चालविण्यास योग्य असतात. म्हणून जो संत ज्या मुमुक्षूला बोध करितो, तो संत त्या शिष्याचा सद्गुरु होतो :- **"गुरुपासूनि घ्यावें ज्ञान। मग तो ईश्वर म्हणूनी त्याचें भजन। त्या भजनें बाणतसें समाधान। जें उपदेशिलें ते ज्ञानची बिंबते श्रुति म्हणे।।"** ती श्रुति ही :- **"यस्य देवे पराभक्ति र्यथा देवे तथा गुरौ। तस्यैते कथिता ह्यर्थः प्रकाशंते महात्मनः।।** सद्गुरुपासून व्यतिरेक अन्वय ज्ञान प्राप्त झाल्यावर त्याच्या दृढ अभ्यासाने श्री मंगेशाचे अव्यक्त स्वरुप चराचरात दिसू लागते."

आता कोणी म्हणेल ती विष्णूची आराधना करून स्वरुपाचा बोध होतो. मग श्री बाबांनी श्री मंगेशाचीच उपासना करून ज्ञान प्राप्ती कशी करून घेतली ? ह्याचे कारण असे आहे की शिव व विष्णू एकच आहेत. त्यांच्या मध्ये तिळमात्र देखील भेद नाही. म्हणून वर सांगितल्याप्रमाणे जो शिवरात्र आणि एकादशी एकनिष्ठेने करितो तोच खरा वैष्णव व शैव. आता श्री बाबांनी श्री मंगेशाचीची उपासना करून ज्ञान कसे प्राप्त करून घेतले ह्याचा खुलासा त्यांच्याच एका पदांत केला आहे, ते पद आपण घेऊ :- **"मांगिरीशा देवा पुरवावी कामना। जळूनि कामा करावे निष्कामा।।"** ह्या पदावरून ही मुख्य गोष्ट शिकण्यासारखी आहे की ऐहिक गोष्टी संबंधाने देवाजवळ काही मागू नये. कारण त्या गोष्टी प्रारब्धाने पूर्वीच ठरविलेल्या असतात. हे पद झाले



तेव्हा मला असे वाटले की श्री बाबांनी माझ्या बी.ए. परीक्षेचा चांगला निकाल लागावा म्हणून श्री मंगेशाची प्रार्थना केली आहे. परंतु हा माझा गैर समज होता. कारण पुढच्या चरणांत :- **"जाळूनिकामा करावें निष्कामा।।"** असे त्यांनी स्पष्ट म्हटले आहे. मायेमुळे कामना उद्भवते. ती उठू नये असेच देवाजवळ नेहमी मागावे:-

**"थकल्या श्रुती वर्णिता तव सत्ता।**

**तेथें मी बाळ काय स्तवूं ताता।।"**

**"वर्णिल कोण गुण वर्जित निर्गुणाला।**

**अद्वैत बोध पद निश्चय पूर्ण झाला।।"**

श्रुतीला ही ज्याचे वर्णन करितां आले नाही, त्या परमात्म्याचे वर्णन कोणाला करितां येईल ? उदाहरणार्थ पेढ्याची अरग बर्फीची गोडी कशी असते हे सांग असे जर कोणाला विचारलें तर पेठ्याची गोडी पेढ्यासारखी असते आणि बर्फीची बर्फीसारखी असते. ह्या पेक्षा त्याला अधिक काही सांगता येणार नाही. श्री मंगेशाने कृपाकरून आपली कथा आपणच करून घेतील तर ती शक्य नाही :- **"तेथें मी बाळ काय स्तवूं ताता।।"**

**"म्हणून मी नमितों दयाळा तुज आतां। देऊनी मती वदवी निज कथा।।**

**उमावरा दयाळा जगदीशा। निर्विकारा सर्वज्ञा मंगेशा।।**

**उद्धाराया भाविक जडजीवां। अवतरलासी गोमांचल स्थान।।"**

हे उमावरा पार्वतीच्या वरा! हिच्या मुळेंच तुला षडगुण प्राप्त झाले. ह्या षडगुणांत दयाळूत्व हा गुण आहे. हा सर्र गुणांत श्रेष्ठ आहे. म्हणून भगवान म्हणतात:- **"अहमात्मा गुडाकेश सर्व भूताशय स्थितः।।"** (भ.गी. १०/२०) भूतदया ही भगवंताची एक मुख्य विभूती आहे. ज्याच्या मध्ये हा गुण आहे तोच प्राणीमात्रांचा सांभाळ करील. श्री मंगेशामध्ये हा गुण विशिष्ट रीतीनें वास करितो. म्हणून —– न्याय व दया, हे गुण त्यालाच शोभतात. हे दोन्ही गुण अंगी असणे फार कठीण आहे. परंतु हे दोन्ही त्याच्या अंगी कसे वास करितात ह्याचा प्रत्येक भक्ताला चांगला अनुभव आहेच. आता त्याने ह्या गोमांचलात अवतार का घेतला ? त्याचे उत्तर असे आहे की :- **"उद्धाराया भाविक जड जीवा।।"** भाविक लोकांचा उद्धार करण्यासाठी

त्याने अवतार घेतला. तो सर्वांच्या सन्मुख आहे. पण आमचीच जर त्याच्यावर श्रद्धा नाही, तर त्याला त्याने काय करावे ? भगवान उद्धवाला म्हणाले :-

**"मी जनासी सदा सन्मुख। जनचि मजसी होय विन्मुख।**

**यासी काही न चले देख। दाटुनि दु:ख भोगिती।।"**

श्री मंगेशाने व्यक्त रुप धारण केल्यामुळे वर सांगितल्याप्रमाणे दयाळूत्व हा गुप्त त्याच्या आंगी आला. म्हणून ज्याप्रमाणे माता बालकांचा सांभाळ करते, त्याप्रमाणे श्री मंगेशाने माझा सांभाळ केला :-

**"माझे कुळीचे दैवत तूं अससी। मातेच्या परी सन्मार्गी लाविसी।।**

**कृपा हस्ते भव चिंता वारिसी। म्हणूनि मी तूतें स्तवितो निशिदिनीं।।"**

आज मी तुझ्या कृपेनेच इतक्या सर्व मंडळीसह तुझ्या दर्शनाचे सुख भोगितो, तुझ्या कृपेनेच मला भजनाची गोडी लागली व त्यामुळे :- **"अहर्निशी हाचि छंद। निरतिशया नंद नंद।।"**

**"नित्यानंद शिवरुपा हृदयस्था। तापत्रयें पोळलों सर्वथा।**

**सद्भावें तूंते आळवीले नाथा। प्रगटूनी हृदयीं नाशिली भवव्यथा।।"**

श्री मंगेश नेहमी आपल्या स्वरुपानंदांत मग्न असतो म्हणजे 'अकार' व 'उकार' ह्या निर्विकल्प व सविकल्प समाधी स्थितींत असून, 'मकाराच्या' अर्थात विश्वाकाराच्या योगाने जे जीव मोहांत सापडून दु:ख भोगतात, त्यांचे ते त्रिताप नाहीसे करून, **"प्रगटूनि हृदयीं नाशिली भवव्यथा।।"** त्यांचा उद्धार करितो. तो सर्वांच्या हृदयांत वास करितो, म्हणून त्याला प्रगट होण्यास उशीर लागत नाही :- **"एवं स्वचित्ते स्वत एव सिद्ध। आत्मा प्रियोऽर्थो भगवाननंत:।।"** येथे कोणी म्हणेल की जर श्री मंगेश सर्वांच्या हृदयांत वास करितो, तर तो आम्हाला का दिसत नाही. तर त्यांचे कारण असे आहे की त्याच्या व आपणामध्ये रजतमाचा पडदा आड असल्यामुळे तो आपल्या बुद्धिला दिसत नाही. लाकडांत अग्नि गुप्त रुपानें आहे, पण तो दिसत नाही. परंतु घर्षणाच्या योगाने तो प्रगट होतो. तद्वत् आत्मानात्म विवेकाचे ज्ञान झाल्यावर खरे वैराग्य उपजते, व बुद्धिंतून रजतम समूळ नाहीसे झाले व पूर्ण चित्त शुद्धि झाली म्हणजे सद्गुरुच्या कृपेनें हृदयात असलेले आत्मस्वरुप दिसू



लागते :-

**"सद्गुरु रुपें प्रत्यक्ष प्रगटूनी। नेऊनी मातें कैलास भुवनीं।**

**दावीलें रुप अक्षय नयनीं। ध्याता तूं तें पार्वती शंकर झाली।।"**

श्री मंगेश रुपी सद्गुरुने स्वरुप दाखविल्यानंतर पुढें त्याचे ज्ञान बाणले पाहिजे म्हणजे शुद्ध सत्वगुणी बुद्धिजी पार्वती, ती स्वरुपाच्या ध्यायाने तद्रूप झाली पाहिजे. त्याला एक उपाय हाच आहे की बुद्धि स्वरुपाकडे लावण्याचा सतत दृढ अभ्यास केला पाहिजे. तेव्हाच ती योग्यवेळी सच्चिदानंद स्वरुप रुप होईल :- **"पीत्वा पीत्वा पुन: पीत्वा यावत्पतति भूतले। उत्थायच पुन: पीत्वा पुनर्जन्मन विद्यते।।"** अशा रीतीने चित्तचैतन्य झाल्यावर मग कसलीच भीती उरत नाही :- **"योग भ्रष्ट नव्हे कधीं।।"**

ही स्थिती क्रमश: सहज रीतीने कोठे होते ह्या विषयीं वसिष्ठ मुनि श्री रामचंद्राच्या निमित्ताने आम्हा सर्वांना सांगतात :- **"सत्संगे भाव उपजे देहीं। सत्संगे सद्गुरु भेटी पाही। सत्संगेचिं देही विदेही। सत्संगे ब्रह्मत्व पाहीं।।"** वेद विहित वर्णाश्रमोचित कर्म केल्यानें ईश्वराची कृपा झाल्याने सत्संगति प्राप्त होते :- **"ईश्वरानुग्रहें साधु संगति।।"** त्या सत्संगतींत श्रवण मननाच्या योगें ईश्वरावर श्रद्धा बसते, आणि मग त्याच्याच कृपेने :- **"सत्संगे सद्गुरु भेटी पाहीं।।"**, संतच सद्गुरु रुपाने स्वरुपाचा बोध देतात. मग त्याचीच ईश्वर ह्या भावनेनें सेवा केल्यावर :- **"मग तो ईश्वर म्हणोनि त्याचें भजन।।"** शिष्य देहींच विदेही होतो, अर्थात् त्याचें चित्त चैतन्य होते.

सारांश श्री मंगेशाची व्यक्त रुपाने उपासना केल्यावर, तोच गुरु रुपानें अव्यक्त स्वरुपाचा लाभ करून देतो. अशा त्या श्री मंगेशाचे दयाळूत्व कोण वर्णू शकेल ?

**"दयाळुत्व तुझें वंदाया न शकें। दर्शना कौतुकें बोलाविसी।।"** हें मंगेशा ! आमच्या हातून तुझी यथाशक्ति सेवा करून घेण्यासाठी तू मोठ्या प्रेमाने आम्हाला आपल्या चरणाजवळ बोलावून आणिलेस. आमची अल्प सेवा मान्य करून घेऊन आमचे अंत:करण शुद्ध कर. जन्मल्यापासू तो आजतागायत तूच आमचे प्रापंचिक व पारमार्थिक बाबतीत रक्षण केलेस. ते तुझे अगणित उपकार आम्ही, जे

यात्किंचित जीव, त्यांना कसे फेडावे ?

**"माता काय करी बाळाचा सांभाळ। तैसा प्रतिपाळ केला तुवा।।"**

हे मंगेशा! आमच्या पंचभौतिक देह धारण करणाऱ्या आईला आपल्याच देहाचे कल्याण करून घेता येत नाही, तेव्हा ती आमचा सांभाळ कसा करणार ? हे मंगेशा! आमचे प्रापंचिक व पारमार्थिक कल्याण करण्याचे सामर्थ्य तुझ्या अंगी आहे. तेव्हा तू आम्हाला आपले अपूर्व वैराग्य व तुझी राम नामाची गोडी दे.

**"अपूर्व वैराग्य राम नामीं गोडी। तुझी मी न सोडी मांगिरीशा।।"**

श्री मंगेशा सारखे वैराग्य फार दुर्मिळ आहे. म्हणून श्री नारायण महाराज आपल्या विचारमालेत म्हणतात :- **"उमावर महावैराग्य सोडूं नको।।"** तसेच श्री मंगेशाचे रामनामावर अत्यंत प्रेम आहे. जर कोणी देवाला अभिषेक करताना कधी कधी शिंगीनाद होतो तो सूक्ष्मरीतीने ऐकेल तर त्यातून रामनामाचा ध्वनी येत असतो अशी त्याची खात्री होईल. आमच्या ह्या मंगेश माऊलीच्या पुढ्यात वैराग्य रुपी उत्तम द्राक्षांचे घोंस व पक्व आम्ररुपी नामाचा ढीग पडलेला आहे. परंतु जसा एखादा वात्रट मुलगा आईच्या पुढ्यात असलेला खाऊ दांडगाईने उचलून घेतो. तशी ह्या माऊलीजवळ असलेली द्राक्षें-वैराग्य व आम्रफळ-रामनामाची गोडी आपण उचलून घेतली तर त्याचा परिणाम असा होईल की शेवटी परंपद जे वैकुंठ ते आपल्याला प्राप्त होईल :-

**"अखिल मागणें हेंचि एक आहे। परंपदी राहें ऐसें करी।।"**

**श्री मंगेशा! "नतद्भासयते सूर्योन शशांको न पावक:।**
**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम।।"** (भ.गी. १५/६)

असे जे तुझे दिव्य स्थान वैकुंठ तेते तू आम्हा सर्वांना तुझ्या पायाजवळ नेऊन ठेव, हेच आमचे सर्वांचे तुझ्यापाशीं मागणे आहे. ती आमची इच्छा तू पूर्ण कर म्हणजे आम्ही कृतकृत्य होऊ.

**"नम: पार्वतीपते हर हर महादेव।।"**

**: नारायण :**



।। श्री सद्गुरुभ्योनम: ।।

# श्री सद्गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन

**शनिवार : १.५.४३**
**सकाळी : ८.४० ते ९.३५**

**हनुमान चिरंजीव गा गडे हो।। धृ.।।**
**शेंदूरचर्चित भव्य मनोहर रुप सुरम्य बघा हो।।१।।**
**प्रस्थापित श्रीसमर्थहस्ते मूर्ती सदोदित ध्या हो।।२।।**
**गातां बघता ध्यातां निशिदिनीं, तन्मय स्वरुपीं व्हा हो।।३।।**
**समर्थ पदींच्या दिव्य पादुका, मस्तकीं नित्य वहा हो।।४।।**
**रामदास-हनुमान-श्रीरामही आत्मस्वरुपी पहा हो।।५।।**
**गुरुचरणामृत अखंड सेवित चिरंजीवपदी रहा हो।।६।।**

ह्या पदांतील –

**गातां बघतां ध्यातां निशिदिनीं । तन्मय स्वरुपीं व्हा हो।।**

ह्यांचे रहस्य श्री तुकाराम महाराजांच्या पुढील अभंगात आले आहे.

**बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव।।**

'बोलावा विठ्ठल' हा कर्म रुप भागवत धर्म भगवंताचे यशगुण गावे तेणें करून अंत:करण शुद्ध होते मग अष्टभाव प्रगट होताच गुरुकृपेनें ज्ञान होते. एवढी सर्व Philosophy त्यात आली आहे. मग गुरुकृपेने ज्ञान झाल्यावर पुढे भक्ति चालू केल्याने सर्वत्र केल्याने सर्वत्र विठ्ठल दिसेल. विठोबाने नामदेवाला सांगितले की मी जरी तुझ्याशी बोलतो, नाना क्रीडा करतो तरी माझे हे खोटे रुप आहे. कारण श्रुति सांगते की 'यद्दष्टं तन्नष्टं' सृष्टीच्या महाप्रलयकाळी माझे हे रुप नाश होणार पण त्यानंतर राहणारे जे अविनाशी रुप त्याची प्राप्ती पाहिजे तर सद्गुरुविसोबा खेचराचे चरण धर. त्याप्रमाणे नामदेव त्यांच्याकडे गेला व त्यांना त्यांच्या कृपेने विठ्ठलाच्या व्यापकरुपाची प्राप्ती धरली. त्यापूर्वी नामदेव जरी विठोबाची एकनिष्ठपणे सेवा करीत होते तरी ते साक्षात्कार होईपर्यंत कच्चेच होते. एकदा चांगदेवांनी सर्वांची डोकी थापटली त्यावेळी नामदेवाचे जोराने थापटले व म्हणाले अजून मडके कच्चे आहे तेव्हा ते रडत रडत विठोबाकडे आले व म्हणाले देवा, तुझ्या संगतीत असून मी कच्चा कसा? तेव्हा विठोबा म्हणाले बाळा संत कधी खोटे बोलत नाही. जा, विसोबांचे चरण धर कृष्णावतारांत अर्जुनाला मी हेच सांगितले.

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।**

**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन:।। (भ.गी.)**

तेव्हा –

जा वेगीं शरण तूं सद्गुरुसी अति दुस्तर वैष्णवी माया रे जा आतांच शरण जा

**आतां रामपायीं मना लागवेगीं सोसिले बहुत अन्याय मागें।। धृ.।।**

**जन्म जन्मांतरी मास नऊ दहा तरी विषय भोगावरी जठर कुहरीं।**

**जन्मलों अधपुरी शिणलें तदुपरी काय सांगू परी दु:खलहरी।।१।।**

आपलेंच स्वत:चे आयुष्य पहा. एक दिवस तरी सुखाचा आहे का? ते मूळ शोधुनि काढिले। दु:खाशी कारण जन्म घ्यावा. म्हणून समर्थ म्हणतात –

**जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारी मना तूंचि शोधुनि पाहे।।**

**न निघतां बाहेरी जेंवि ओटी सरी जन्मद्वारीं करी अटक भारी।**

अनंत जीव हे दु:ख भोगीत आहे. ह्यांतून सोडविण्यास एका सद्गुरु शिवाय कोण समर्थ आहे. म्हणून सांगतात की आतांच त्यांचे चरण धरा –

**जन्म झाल्यावरी दु:ख नानापरी रडत कोऽहं स्वरीं देहधारी।।२।।**



गर्भात सोऽहंचा जप करतो व हे बाहेर पडतांच हे आत्मतत्व गुरुकडून जाणून घ्यावे व मातेच्या उदरांत पुन्हा येऊ नये म्हणून ठरवितो पण बाहेर येताच मायेच्या झोल्यांत पडून सर्व विसरतो.

**बालपण नेणतां तारुण्य उन्मत्तता विषय लोलंगता चित्त होते।**

बालपण अज्ञानात जाते. तारुण्यांत ताठा येतो व देवाला विसरतो.

**वृद्धपण आलिया गलिततनु झालिया स्मरणपद गेलिया स्वहित राहते।।३।।**

वृद्धपणी सर्व इंद्रिये शितील होतात ती काही करू इच्छित नाही. स्मरणशक्ती व –

**बसविल्या उठेना। उठवल्या हालवेना। हालवेल्या चालवेना समर्था।।**

अशा स्थिती होते मग कसा परमार्थ करणार? वृद्धपणांत प्रपंचच जर होत नाही मग वेदांतासारखा गहन विषय कसा साधणार? म्हणून काय कर? तर हे पद जेव्हा कानांत पडले तेव्हाच परमार्थाला लाग. मुहुर्त पाहत बसू नको.

**अगम निगमीं बरें बोलिलें जे कवे तेंचि तूं विसरशी स्वहित का जी।**

**रंगसी निजपदीं मोहमाया नही आटली घे जरी भाक माझी।।४।।**

आत्मानंदांत नेहमी रममाण पावणारे असे श्रीरंगनाथस्वामी सांगतात की जेव्हा आत्मपदी रंगशील तेव्हाच ही मोहमाया नदी आटून जाईल व ती पायवाट होईल म्हणून मिराबाई म्हणतात :-

**मोरी लागीं लटक गुरुचरननकी ।। धृ.।।**

गुरुचरणाची लटक लागली पाहिजे

**चरनबिना मुझे कछु नहिं भावे। झुंठी माया सब सपननकी।।१।।**

**भवसागर सब सुक गयी है। फिकीर नही मुझें तरननकी।।२।।**

असे गुरुचरणाच्या ठिकाणी प्रेम असल्यावर ब्रह्मानंदाला काय तोटा? त्यात नुसता नाचेल. श्री तुकाराम महाराज म्हणतात :-

**लोखंडाचे चणे खावे। त्याने ब्रह्मपदीं नाचावे।।**

पण असे गुरुच्या ठिकाणी प्रेम असल्यावर कशाला लोखंडाचे चण पाहिजेत पण एवढे खरे की असे प्रेम असणें हेच लोखंडाचे चणे खाण्याइतके कठीण आहे. तेव्हा अशी गुरुचरणीच्या ठिकाणी आवड पाहिजे. गुरुचरण हेच परमार्थाचे रहस्य आहे. ज्याच्या हातांत गुरुचरण त्याला परमार्थ सहज साधला म्हणून समजावे.

सत्संगतीत जावे कसे ? तर मोरोपंत म्हणतात.

**"सत्संगती शिरावें बालजनन्यचली जसें शिरते।"**

बालक हे मातेच्या स्तनाकडे धाव घेतो कारण तेथे सर्व सुख आहे. जे अत्यंत गुरुभक्त आहेत ते गुरुचरण एक घटकाही सोडित नाहीत पण एवढी गोडी लागण्यास प्रथम भगवत्कृपा पाहिजे.

**पूर्ण करितां भगवद्भक्ति। गुरुभजनासी अधिकार प्राप्ती।**
**सद्गुरु महिमा सांगो किती। मी आज्ञावर्ती श्रीगुरुचा।। (ए.भा.)**

अशा गुरुभक्ताची सेवा भगवान म्हणतात मी करतो मग त्याला काय कमी आहे ? म्हणून म्हणतो ज्याला गुरुचरणाची अत्यंत आवड आहे त्याला परमार्थ म्हणजे हातचा मळ आहे म्हणून मिराबाई म्हणतात :-

**मोरी लागी लटक गुरुचरननकी।।**
**भवसागर सब सुकगयो है। फिकिर नहीं मुझे तरननकी।।२।।**

गुरुकृपेने भवसागराची पायवाट झाली.

**गुरुकृपेने प्रभू गिरिधर नागर। उलट भयी मोरे नयननकी।।३।।**

मिराबाई म्हणतात माझी गुरुकृपेने अंतदृष्टी झाली म्हणूनच भवसागर आटला. तेव्हा असा हा भक्तीचा राजमार्ग आहे.

**यानास्थाय नरोराजन्नप्रमाद्येत कर्हिचित्।**
**धावन्निमिल्यवानेमे नस्स्वलेन्न पतेहिहा।। (भागवत)**

अडखळणेंच नाही मग पडणे कोठले ? हा मार्ग कशान प्राप्त होईल तर केवळ गुरुचरण धरल्याने म्हणून म्हणतात.

**जा वेगी शरण तूं सद्गुरुसी। अति दुस्तर वैष्णवी माया रे।। धृ.।।**
**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।**
**मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते।। (भ.गी.)**

ही माया तरून जाण्याला सोपा उपाय म्हणजे मी जो सगुण ब्रह्म तोच सर्वत्र आहे असे करा. हेच Complete submission to the will of God.

**अर्जुना तूं जाण रे। होशील सुजाण रे।**
**विश्व नाही मीच आहे। सखया तुझी आण रे।। (वा.पं.)**

आपण देव मोठे म्हणतो पण त्यातून त्यांना मोक्ष नाही. मानवी तनूतच मोक्ष



मिळतो म्हणून कित्येक देव आमची envy करतात. पण जो अव्यभिचारी भक्ति करतो त्याच्या भोवती विष्णूचे चक्र नेहमी फिरत असते. त्याला कोणी काही करू शकत नाहीत.

**सखा सोयरा स्वामी तूं शेषशायी, म्हणूनि सुहृद्भाव तुझ्याच ठायीं।**
**जया रक्षितां तूं जनीं नित्य होसी, शकेना करू विघ्न कोणी तयांसी।।**
**महाविघ्न सेनापति मोठमोठे, तयांचे शिरीं देवोनि पाय वाटे।**
**हरी, चालती मोक्षमार्गी तुझ्यांजे, तशांही न ते बाधती विघ्नराजे।।**
**दुर्लभ कलियुगीं सुरगण वांछिती। मोक्षद मानवीं काया रे।।१।।**

मी आत्मा आहे ह्याची जाणीव करून घेण्याची सोडून सर्व आयुष्य विषय सुखांत घालवितात पण

**नेणुनि निजहित विषय सुखास्तव। घालविलें वय वायां रे।।२।।**
**आतां तरी पुढें हाचि उपदेश। नका करूं नाश आयुष्याचा।।**
**स्त्रीगृह सूत धन लौकिक इच्छुनियां। आर्जविशी किती रायां रे।।३।।**
**स्थिरचर एका जनार्दन भावुनि। त्र्यंबक आठवि पाया रे।।४।।**

त्र्यंबकाचे सद्गुरु श्री एकनाथ महाराज व त्यांचे सद्गुरु जनार्दन किंवा सर्व एका जनार्दन आहे. जगद्रुपेंकरून भगवान असे आपले सद्गुरुराजच नटले आहेत असे ध्यान करून त्यांचे चरणवंदन करतो. पण हे ध्यान कोठे करतो ? तर

**श्रीगुरुचें चरणकुंज हृदयीं स्मरावे।। धृ.।।**

त्यांच्या सर्वांगाला चरण आहेत. अपाणिपादाशी तद्रुप झालेले –

**अपाणिपादो जवनोग्रहिता पश्यंत्यचक्षुः सशृणोत्यकर्णः।**
**स एव वेद्यं नचतस्य वेत्ता तमाहुरग्रंथ पुरुषं पुराणं।।** श्रुति

असे त्याचे स्वरुप हृदयांत आणून मग त्याचे ध्यान करतो. सद्गुरुची जरी तनू साडेतीन हाताची दिसली तरी ती विश्वतनु आहे. म्हणून श्री वामन पंडित म्हणतात :-

**साध्दत्रिहस्त जरी वामन दीसती ते।**
**विष्णुस्वयें तनुहि देव नदी सती ते।।**

विश्वाला व्यापून असलेले जे तत्व ते आपणच झालो. पण ही तनु काहीं किमतींची नाही का ? तर ही तनु म्हणजे गंगेची वडील बहिण आहे. गंगा फक्त पातक नाहीसे करते पण ही संततनु पुण्यपाप दोन्ही नाहीसे करते. पुण्यपाप गेल्याशिवाय

मुक्त होणार नाही. गंगा ही पाप घालविते पण पुण्याची बेडी दृढ करते व मग वरचा लोक मिळतो पण (क्षीणे पुण्ये मर्त्य लोकंविशांती) व 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम' हे काही चुकत नाही. म्हणून संततनुचे माहात्म्य गंगेहून जास्त आहे. तेव्हा मुक्त होण्याला संततनुचा आश्रय केला पाहिजे व त्याच्या चरणांतून जी गंगा वाहते तिच्यात नित्य स्नान करावे म्हणून श्री तुकाराम महाराज म्हणतात :-

**पडोनियां राहीं। उगाचि संताचिये पायीं।।१।।**

तात्पर्य सत्संगत ही केलीच पाहिजे. पुष्कळ ग्रंथ वाचले, निरुपण करता येऊ लागले तरी काही होणार नाही. परमार्थाला सत्संगत हीच कारण आहे. पण ही मिळण्यास पूर्व पुण्याई पाहिजे म्हणून श्रीनाथ म्हणतात :-

**कोटी जन्माची पुण्यसंपत्ती। जरी आयती असेल गांठी।**
**तरीच जोडे माझ्या संतांची संगती। सत्संगे भक्ति उल्हासे।।**

व असे संत :-

**ऐसे प्राप्त पुरुष। संसारी नाहीं गा बहुत।**
**हिंडता अवघ्या जगांत। एखादा कदाचित देखिले।।**

म्हणून श्री वामन पंडित म्हणतात :-

**ब्रह्म अनुभव अनुभवतीते सज्जन साधू घरोघरी कैंचे।।१।।**
**वासुकि मस्तकीं रत्न असे परि ते फणिराज बिळोबिळी कैंचे।।२।।**
**हत्तिचे मस्तकीं मुक्त असे परि ते गजराज बिदोबिदी कैंचे।।३।।**
**सुवर्ण कस्तुरी नाभी असे परि ते मृगराज वनोवनी कैंचे।।४।।**
**सच्चितसुखमय जनीं असे परी। ते यतिराज मठोमठी कैंचे।।५।।**

सर्व जग सच्चिदानंदरुप आहे पण त्याचा अनुभव असणारे फार थोडे. श्री वामन पंडित म्हणतात आचार्यांच्या मठांत शब्दज्ञानी पुष्कळ आहेत. पण सच्चिदानंदयती सारखे दुसऱ्याला सच्चित्पदावर बसविणारे कोणी नाहीत. परमार्थ हा अनुभव घेण्यासाठी आहे नुसते बोलाचे ज्ञान काय कामाचे ? हल्ली परमार्थावर बोलणारे पुष्कळ आहेत पण त्याचा अनुभव घेणारे फार थोडे.

◈◈◈



# विनंती

सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक आजवर आपण इ.स. १९२८ सालापासून प्रसिद्ध करीत आहोत. सद्गुरु श्री भाई, श्री दादाभाई ह्यांचे आणि इतरही संतांचे विचार सर्वत्र प्रसारित होऊन, सद्भक्ती मंदिरातील घडामोडींचा आढावा आणि नजीकच्या काळात होणाऱ्या उत्सव-महोत्सवा विषयीची समग्र माहिती ह्या त्रैमासिकातून भक्तगणांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ह्या नियतकालिकातर्फे आपण करीत असतो.

मुंबई शहराबाहेरील सभासदांना त्यांची प्रत पोस्टाने पाठवली जाते. तर स्थानिक सभासद सद्भक्ती मंदिरात येऊन आपापली प्रत घेऊन जातात.

गेल्या काही वर्षात छपाईच्या खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. सभासदांकडून जी काही वर्गणी पूर्वी घेतली आहे ती त्या काळात योग्य अशीच होती किंवा असावी. मात्र आता त्या वर्गणीच्या रकमेमध्ये हा छपाईचा आणि पोस्टाचा खर्च अजिबात भागत नाही.

**सभासदांकडून अधिक वर्गणी मागण्याची सद्भक्ती प्रसारक मंडळींची इच्छा नाही.**

त्या ऐवजी अलीकडेच विकसित झालेल्या आपल्या वेबसाईटवर सद्भक्ती प्रकाश हे त्रैमासिक अपलोड केले जाईल.

ज्या सभासदांना इंटरनेटची सुविधा नाही किंवा इतर काही कारणामुळे वेबसाईट वरील माहिती वाचणे शक्य नसेल त्यांनी खालीलपैकी एखाद्या कार्यकर्त्यांशी संपर्क करावा. आपापले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस (असल्यास) पाठवून द्यावेत.

ज्यांना हे शक्य आहे त्यांना विनंती आहे की त्यांनी देखील आपले मोबाईल नंबर्स आणि ई-मेल ॲड्रेस वर उल्लेख केलेल्या कार्यकर्त्यांपैकी कुणालाही पाठवून द्यावा, जेणेकरून जेव्हा त्रैमासिक अपलोड केले जाईल तेव्हा त्याची सूचना देता येईल.

**सर्व सभासदाना विनंती आहे की ह्या विनंतीच्या संदर्भात त्यांनी जरूर संपर्क साधावा.**

**संपर्क :-**

१. श्री. विवेक ताम्हाणे - दू. भ्र. क्र. ९८२०३५०८६७
२. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
३. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

✦✦✦

।। श्री सद्गुरु प्रसन्न।।

# (एप्रिल ते जून २०२२) महिन्यातील उत्सव व महोत्सव

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २.४.२०२२ (चैत्र शु. १) | गुढीपाडवा सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| शनिवार | दि. ९.४.२०२२ (चैत्र शु. ८) | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज व श्री लक्ष्मण महाराज यांच्या इंदूर येथील पादुका स्थापनेचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री लक्ष्मण महाराजांच्या चरित्राचे वाचन. |
| रविवार | दि. १०.४.२०२२ (चैत्र शु. ९) | श्री रामनवमी व श्री सोहिरोबानाथ पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री रामजन्म दुपारी १२ वा. पाळणा. रात्रौ ९ वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि.१६.४.२०२२ (चैत्र पौर्णिमा) | श्री हनुमान जयंती. सकाळी ६.३० वाजता हनुमान जन्म. स्तवन व प्रार्थना. रात्रौ ९वाजता पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि.३०.४.२०२२ (चैत्र वद्य १५) | श्री पार्वतीमाता जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

## (वैशाख मास)

| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि. ३.५.२०२२ (वैशाख शु. ३) | अक्षय तृतीया श्री परशुराम जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

## परम भगवत् भक्त श्री वामन पंडितांचा पुण्यतिथी महोत्सव

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ५.५.२०२२ (वैशाख शुद्ध ४) | श्री रामानुजाचार्य जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. ६.५.२०२२ (वैशाख शुद्ध ५) | श्री आद्य शंकराचार्य जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी हळदीकुंकू. |



| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि.७.५.२०२२ (वैशाख शुद्ध ६) | श्री वामन पंडित पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद सायंकाळी चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता सद्भक्ती मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| रविवार | दि. ८.५.२०२२ (वैशाख शुद्ध ७) | सायंकाळी नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. ९.५.२०२२ (वैशाख शुद्ध ८) | दुर्गाष्टमी सायंकाळी ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. रात्रौ ८.३० वाजता श्री भाईंचा शेजोत्सव. |
| मंगळवार | दि. १०.५.२०२२ (वैशाख शुद्ध ९) | उत्सव समाप्ती व कळकळीची विनंती. |
| शनिवार | दि. १४.५.२०२२ (वैशाख शुद्ध १३) | श्री नृसिंह जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

## परमगुरुवर्य श्री शंकर व्यंकटेश टाकी उर्फ श्रीबाबांची पुण्यतिथी उत्सव

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. २९.५.२०२२ (वैशाख वद्य १४) | श्रीबाबांची पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण महाप्रसाद. सायंकाळी चरित्रवाचन. 'पितापुत्र व गुरुशिष्य' या प्रवचन वाचनास प्रारंभ. |
| सोमवार | दि. ३०.५.२०२२ | सायंकाळी श्री बाबांच्या ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| मंगळवार | दि. ३१.५.२०२२ | हळदी कुंकू सायंकाळी. नामसंकीर्तन उत्सव समाप्ति. |

## (ज्येष्ठ मास)

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ९.६.२०२२ (ज्येष्ठ शु. १०) | गंगावतरण दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| शुक्रवार | दि. २४.६.२०२२ (ज्येष्ठ व ११) | श्री निवृत्तीनाथ पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |

**जुलै ते सप्टेंबर २०२२**

## आषाढ ते भाद्रपद मास

| | | |
|---|---|---|
| रविवार | दि. १०.७.२०२२ | आषाढी एकादशी. सकाळी स्तवन व प्रार्थना. आषाढी एकादशी व (शंकर सुधा पान नं. ५४ वाचणे) |
| बुधवार | दि. १३.७.२०२२ | गुरुपौर्णिमी. सकाळी स्तवन व प्रार्थना ११.३० गुरुपादुकास एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. सायंकाळी परमार्थ दीपिका वाचन. |
| गुरुवार | दि. १४.७.२०२२ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| शुक्रवार | दि. १५.७.२०२२ (आषाढ कृ. २) | परमपूज्य श्री दादाभाई जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. १०.०० वाजता जन्मोत्सव पाळणा व पदे. ११.३० एकादशणी सायंकाळी चरित्र वाचन. रात्रौ ८.३० वाजता शेजोत्सव. |
| रविवार | दि. १७.७.२०२२ | नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि. १८.७.२०२२ (आषाढ कृ. ५) | आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी चरित्र वाचन. |
| मंगळवार | दि. १९.७.२०२२ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| मंगळवार | दि. २६.७.२०२२ (आषाढ कृ. १३) | श्री नामदेव महाराज पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| बुधवार | दि. २७.७.२०२२ (आषाढ कृ. १४) | श्री संत सावता माळी पुण्यतिथी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. १.८.२०२२ | इंग्रजी तारखेनुसार श्री भाईंचा जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. ८.८.२०२२ (श्रावण शु. ११ पुत्रदा एकादशी) | गुरुवर्य श्री भाईंचा जयंती दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री भाईंचे चरित्र वाचन. सायंकाळी ७.४७ वाजता जन्म पाळणा व पदे. |



| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ११.८.२०२२ (श्रावण पौर्णिमा नारळी पौर्णिमा) | श्रावणी व होम हवन |
| शनिवार | दि. १३.८.२०२२ (श्रावण कृ. १) | सिद्धारुढ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. सायंकाळी श्री सिद्धारुढ स्वामींच्या चरित्राचे वाचन. |
| गुरुवार | दि. १८.८.२०२२ (श्रावण कृ. ८) | श्री कृष्ण जयंती व लक्ष्मण महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. श्री कृष्ण जन्म व पाळणा रात्रौ १२.०० वा. श्री रमावल्लभ दासांची पदे रात्रौ १०.३० वा. |
| शुक्रवार | दि. १९.८.२०२२ (श्रावण कृ. १९) | गोपाळकाला. सद्भक्ति मंदिराचा वर्धापन दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. ३१.८.२०२२ (भाद्रपद शु. ४) | श्री गणेश चतुर्थी. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| मंगळवार | दि. ६.९.२०२२ (भाद्रपद शु. ११) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. ११.९.२०२२ (भाद्रपद शु. १) | श्री दादाभाई मालय दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि. २१.९.२०२२ (भाद्रपद शु. ११) | श्री बलभीम महाराज पुण्यतिथी दिन. सकाळी स्तवन व प्रार्थना. |
| सोमवार | दि. २६.९.२०२२ (आश्विन शु. १) | घट स्थापना. शारदीय नवरात्र प्रारंभ. सायं भजनानंतर श्री दुर्गा स्तोत्र, नवरात्र उपासना व कलौचंडी विनायको वाचणे. |

✦✦✦

# : देणगीदारांसाठी निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता सद्भक्ती प्रसारक मंडळींचे दोन बँक अकाऊंट्स आहेत. त्यापैकी कुठल्याही एका अकाऊंटला पैसे पाठवू शकता. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| **Name of the Account** | : | Sadbhakti Prasarak Mandali |
|---|---|---|
| **Bank Name** | : | NKGSB Co.Op. Bank Ltd. |
| **Account No** | : | 00610010000130 |
| **IFSC Code No.** | : | NKGS0000006 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| | | **OR** |
| **Bank Name** | : | Bank Of India |
| **Account No** | : | 016410110005797 |
| **IFSC Code No.** | : | BKID0000164 |
| **Branch** | : | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |

ज्या भक्तांना नेट बँकिंगचा उपयोग न करता पैसे चेक किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवायचे असतील, त्यांनी कृपया खालील पत्त्यावर पाठवावे. त्वरित आणि सुरक्षित डिलिव्हरी करिता स्पीडपोस्ट किंवा कुरिअरचा वापर करावा.



**Mr. Vivek Tamhane**
Tamhane & Mehta (Chartered Accountants)
1, Gauresh Apartment, Ground Floor, Old Police Lane,
Near Andheri Court, Andheri (East), Mumbai : 400 069.
**Tel No. : 022-2683 2838**

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

| | | |
|---|---|---|
| १. श्री. विवेक ताम्हाणे | भ्रमणध्वनी | : ९८२०३५०८६७ |
| २. श्री. नागानंद निळेश्वर | भ्रमणध्वनी | : ९८२१२७०७७२ |
| ३. श्री. अरूण विजयकर | भ्रमणध्वनी | : ९२२३२२२२४५ |

✦✦✦

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) सतीचं वाण घेतल्याप्रमाणे संत पारमार्थिक क्षेत्रांत वावरतात.

२) ज्यांनी सार्वजनिक जीवन शुद्ध व निर्भेळ ठेवले आहे. त्यांच्याच वक्तव्याचा श्रोतृवृंदावर सुपरिणाम होतो. नि:स्पृह भाषण ऐकल्यावर त्यात काढलेले निष्कर्ष व केलेले मूल्यमापन बरोबर आहे हे ऐकणाऱ्यांना वाटते.

३) आपली प्रतिष्ठा वाढावी म्हणून संत मुद्दाम चमत्कार करतात असे नाही. कारण त्यांना प्रतिष्ठेची आवडच नसते. परंतु केवळ दीन दुबळ्या दु:खी लोकांना पाहून त्यांचे अक्षय्य कल्याण करण्याकरितां सर्व प्रकृति नियमांचा चालक परमेश्वराशी एकरुप झालेल्या संतांकडून सहज काही लोकविलक्षण घटना घडतात. त्या सर्वदा घडणाऱ्या नसल्यामुळे प्राकृत लोक त्यास चमत्कार म्हणतात.

४) भलेपणाने आणि दुसऱ्याचे मन सुखावेल असे वागण्यात मोठा आनंद असतो. रोज कुणाला तरी हसवीत जावे. दुसऱ्यांना हसविता हसविता आयुष्य केव्हा संपेल ते कळणारही नाही. ज्याला शिकायचे असते तो शिकतच असतो. परमार्थांत तर औपचारिकपणा फार वाईट असतो.

५) एखाद्या व्यक्तीच्या कामगिरीची प्रशंसा करताना, कौतकु करताना, तिच्यात कुठं तरी शोधून का होईना काही तरी उणे दाखविण्याची आजकाल फॅशन झाली आहे.

६) आपल्या प्रक्षुब्ध भावनांना आवर घालून विवेक आणि समंजसपणा दाखविण्याची आज अत्यंत गरज आहे.

७) उदयात उमलणं असतं तर अस्तांत कोमेजणं असत. पहाटे पहाटे अचानक उमललेली कळी मन मोहून टाकते. पण तीच कळी कळ्या पाकळ्यांनी



फुलत फुलत जाऊन पाकळी पाकळीनंच देठापासून विलग होऊ लागते. तेव्हा आपल्या मनाचे काठ विषादानं ओलेचिंब करून जाते ना ?

८) किनाऱ्याच्या भेटीसाठी आसुसलेला सागर भरतीच्या लाटालाटांतून प्रगट होत असतो तर किनारा सोडायला अनुत्सुक असलेला हिरमुसला सागर त्याच्या लाटेलाटेनं मागंमागं जाताना ओहोटीच्या रूपानं पुन्हा पुन्हा किनाऱ्याकडे वळून वळून पाहात असतो.

९) पांढऱ्या शुभ्र धोतराला मध्येच एखादी काळी किनार असावी तशी दु:खाची एक सुरकती हसत असताना सुद्धा ताप देऊन जाते.

१०) आपल्या जीवनाचा मागोवा घेतानाही सुख-दु:खाचे असे कितीतरी प्रसंग अनुभवीतच 'शेवटचा दीस गोड व्हावा' यासाठी किती मजर दरमजल केलेली असते.

◈◈◈

# सद्भक्तांना आवाहन

इ.स. १९२२ सालातील विजया दशमीच्या सुमुहूर्तावर प.पु. श्रीभाईंनी (श्री रामचंद्र शंकर टाकी, अर्थात श्री टाकी महाराज, २रे) सद्भक्ती प्रसारक मंडळी ह्या न्यासाची (ट्रस्ट) स्थापना केली. दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी, म्हणजे ह्या वर्षीच्या विजयादशमीस ह्या संस्थेला ९९ वर्षे पूर्ण होऊन शंभराव्या वर्षात पदार्पण केले आहे. ह्या ९९ वर्षातील संस्थेची यशस्वी वाटचाल केवळ श्रीगुरुकृपेमुळे आहे ह्याची जाणीव सर्व विश्वस्तांना आहे आणि श्रीगुरुंची अशीच अखंड कृपादृष्टी सद्भक्ती मंदिरावर आणि समस्त भक्तजनांवर राहो, अशी त्यांचे चरणी प्रार्थना आहे.

सद्भक्ती मंदिर ही वास्तू प.पु. श्रीभाईंनी इ.स. १९२३ साली बांधली. पुढील वर्षीच्या विजया दशमीच्या दिवशी, म्हणजे दि. ५ ऑक्टोबर २०२२ रोजी, सद्भक्ती मंदिर शंभराव्या वर्षात पदार्पण करेल. त्या निमित्ताने ह्या दिवसापासून पुढील वर्षभर, अर्थात इ.स. २०२३च्या विजया दशमीपर्यंत शताब्दी वर्ष साजरे करण्याची प्रेरणा श्रीगुरुंनी दिली आहे. त्या निमित्ताने वर्षभर विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रम करण्याचे योजिले आहे. श्रीगुरुंचीच प्रेरणा असल्यामुळे शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्यास त्यांचेच मार्गदर्शन लाभून सर्व कार्यक्रम यशस्वी होतील अशी खात्री आहे.

शताब्दी वर्ष साजरे करण्यासंबंधी विश्वस्त मंडळी नियोजन करीत आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमात गायन, वादन, नर्तन इत्यादी सादर करण्याकरिता देशभरातील नामवंत कलाकारांना पाचारण करण्याविषयी विचार विनिमय चालू आहे. सामाजिक उपक्रमात, श्रीभगवद्गीता, श्रीरामरक्षा आणि श्रीहनुमानचालीसा ह्यांचे शालेय विद्यार्थ्यांकडून पाठांतर करून घेऊन एक स्पर्धा आयोजित केली जाईल. विजेत्यांना श्री टाकी महाराजांच्या नावे योग्य ती पारितोषिके दिली जातील. जे विजेते नाहीत पण ज्यांनी स्पर्धेत भाग घेतला आहे अशा स्पर्धकांना उत्तेजनार्थ सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे स्मृतिचिन्हे दिली जातील.

सद्भक्ती ग्रंथालय आणि वाचनालय सुरू करण्याचा मंडळींचा मनोदय आहे आणि त्या दिशेने पावले टाकायला सुरूवात झालेली आहे. धार्मिक कार्यक्रमात मुख्यत: महाराष्ट्रातील नावाजलेल्या कीर्तनकारांचे कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केले जातील. शताब्दी वर्षातील प्रायोजित कार्यक्रमांची ही एक ढोबळ रूपरेषा आहे.



प.पु. श्री भाईंचे मराठी, इंग्रजी आणि चक्क लॅटिन ह्या भाषांवर प्रभुत्व होते. पण संस्कृत भाषेकडे ते आकृष्ट होऊन ती भाषा आत्मसात करण्याची त्यांना जबर आस लागली आणि पुढे श्री मंगेशाच्या कृपेने त्यांची त्या काळातील देशातील सर्वोत्तम संस्कृत विद्वान माननीय पंडित श्री फोंडूशास्त्री सुखटणकर ह्यांची गोव्याच्या त्या पवित्र भूमीत गाठ पडून प.पु. श्री भाईंनी संस्कृत भाषेवरदेखील कसे प्रभुत्व मिळविले ह्या विषयीच्या वृत्तांत आपण त्यांच्या चरित्रात वाचलाच आहे. प.पु. श्री भाईंचा संस्कृत भाषेकडे असलेला ओढा लक्षात घेऊन संस्कृत भाषेचा प्रसार होण्याकरिता संस्कृत प्रबोधिनी सद्भक्ती प्रसारक मंडळींतर्फे नियमितपणे आयोजित केल्या जातील.

सद्भक्ति मंदिर या वास्तूला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत म्हटल्यावर ह्या इमारतीत दुरुस्ती, डागडुजी करण्याची नितांत आवश्यकता आहे. बांधकामाच्या संदर्भातील कामे, इलेक्ट्रिकल कामे, प्लाम्बिंग, रंगरंगोटी इत्यादी गोष्टी विचाराधीन आहेत आणि ही सर्व कामे करणे अत्यंत गरजेचे आहे.

ह्या सर्व कार्याकरिता बऱ्यापैकी खर्च होणार ह्याची जाणीव आहे. अंदाजे २५ लाख रुपये इतका खर्च येईल असे अनुमान आहे. ह्या पूर्वीचा अनुभव असा आहे की जेव्हा जेव्हा सद्भक्ती मंदिराकरिता काही आर्थिक गरज उत्पन्न झाल्यास आवश्यक तितका निधी श्रीगुरुकृपेने आपोआपच आणि योग्य वेळी उभा राहात असे. ह्या खेपेस देखीला सद्भक्त सढळ हस्ते मदत करतील अशी आशा नव्हे तर खात्री आहे.

ईश्वरी संकल्प तो स्वत: परमेश्वच पूर्ण करून घेतो. आपण केवळ निमित्तमात्र आहोत. तरी जेव्हा श्रीगुरुंच्या प्रेरणेनेच हा शताब्दी वर्ष सोहळा साजरा करण्याचे योजिले आहे. तेव्हा हा ईश्वरी संकल्प पूर्ण करण्याकरिता चहुबाजूंनी मदतीचे हात पुढे येतील ही खात्री आहे.

ओम श्रीगुरुदेवदत्त!

# विशेष सूचना

सर्व भक्तांना कळविण्यास आनंद होतोय की आपले संकेत स्थळ, अर्थात वेबसाईट, www.sadbhaktimandir.com आता पूर्णत: कार्यरत झाले आहे. श्री दत्तगुरुंची कृपा, श्री नारायण महाराज जालवणकरांची आज्ञावजा प्रेरणा आणि प.पु. सद्‌गुरु श्री टाकी महाराज ह्यांचे आशीर्वाद पाठीशी असल्यामुळेच हे शक्य झाले.

सद्भक्ती मंदिर, प.पू. श्री टाकी महाराज (तिन्ही पिढ्या), श्री दत्तगुरु परंपरा, संत साहित्य, संत चरित्र, काही निवडक पदांचे श्राव्य प्रसारण (ऑडिओ), काही फोटो, आगामी उत्सव किंवा कार्यक्रमांची माहिती आणि इतर आवश्यक बाबी, इत्यादी उपयुक्त माहिती ह्या संकेत स्थळावर दिली आहे.

सद्भक्ती प्रकाश हे आपले त्रैमासिक देखील ह्या संकेत स्थळावर उपलब्ध केले जाते. सदरहू त्रैमासिक देखील योग्य समयी अपलोड केले जाईल. जिज्ञासूंनी ह्या संकेत स्थळाला जरूर भेट द्यावी आणि आमच्याशी संपर्क साधावा. आपला अभिप्राय अपेक्षित आहे.

अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हे आपले Facebook सदर (पेज) सुद्धा कार्यरत झालेले आहे. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे Sadbhakti Mandir हा आपला You Tube चॅनेल देखील कार्यरत झाला आहे.

सर्व भक्तांना विनंती आहे की त्यांनी आपल्या व्हॉट्सॲप आणि फेसबुक वरील आणि इतर मित्र परिवारात, ह्या आपल्या तिन्ही प्रसार स्थळांची माहिती देऊन सद्भक्ती मंदिर आणि सद्भक्तीपंथ ह्यांचा जास्तीत जास्त प्रसार होऊन आपल्या प.पु. सद्गुरुंचे विचार आणि त्यांची शिकवण सर्वत्र प्रसिद्ध होण्याकरिता हातभार लावून गुरुसेवेच्या ह्या संधीचा लाभ घ्यावा.

✦✦✦